


Subscribe इयत्ता – चौथी (9 जुलै) माझा अभ्यास Subscribe

# शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

### शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस नववा :






गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

उतारा वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

## २. बोलणारी नदी

**प्र. २. खालील प्रश्नांची उत्तरे तुमच्या मनाने लिहा.**

(अ) तुम्हांला काय खावेसे वाटते?

(आ) घरातील मोठी माणसे कोणते पदार्थ खाऊ नयेत, असे सांगतात ?

(इ) तुम्हांला कंटाळा आल्यावर काय करावेसे वाटते ?

**प्र. ३. दोन अक्षरी शब्द – गळा, तीन अक्षरी शब्द – घोटाळा, चार अक्षरी शब्द – घळाघळा यांसारखे शेवटी 'ळा' हे अक्षर येणारे प्रत्येकी चार शब्द लिहा.**

**प्र. ४. कोण, कोणाला म्हणाले ?**

(अ) ''नको बुडवू शाळा.''

(आ) ''काय खाऊ आणलास ?''

(इ) ''तू बदामी पेढे नदीत टाकलेस !''

(ई) ''काय गं लीला, नदी तुझ्याशी बोलते ?''

**प्र. ५. खालील शब्दांचे अनेकवचन करा.**

(अ) डबा (आ) बैल (इ) नदी (ई) डोळा (उ) दिवस (ऊ) पेढा

**प्र. ६. लीलाप्रमाणे तुम्हांला नदीशी बोलायचे असेल, तर तुम्ही नदीशी काय बोलाल ?**

**प्र. ७. या पाठात 'वावर' हा शब्द आलेला आहे. वावर या शब्दाचे दोन अर्थ सांगणारी खालील वाक्ये वाचा.**

- रामजीच्या वावरात कापसाचे पीक आहे. (वावर–शेत)
- सरपंचांच्या घरात लोकांचा नेहमी वावर असतो. (वावर–वर्दळ, ये–जा.)

याप्रमाणे दोन अर्थ असलेले पाच शब्द शोधा. प्रत्येक शब्दाचे दोन अर्थ दाखवणारी वाक्ये लिहा.

**उपक्रम :** शिक्षक किंवा पालक यांच्यासोबत तुमच्या गावातल्या नदीवर जा. नदीचे निरीक्षण करा. वहीत नोंदवा.





टेस्ट सोडवा

# आकृत्यांचे कडा व कोपरे ओळखा.


## भौमितिक आकृत्या : शिरोबिंदू व बाजू

**सराव**

◆ खालील आकृत्यांचे निरीक्षण करून तक्ता पूर्ण करा.

| आकृती |  |  |  |
|---|---|---|---|
| आकृतीचे नाव | | | |
| कडांची संख्या | चार | ............... | ..................... |
| कोपरे | चार | ............... | ..................... |

### आयत




आयताला चार कडा म्हणजे चार बाजू असतात. जिथे दोन बाजू मिळतात, त्या बिंदूला शिरोबिंदू म्हणतात.
शेजारील आकृतीत अ, ब, क, ड हे शिरोबिंदू आहेत.


या ठिकाणी बाजू अब, बाजू बक, बाजू कड आणि बाजू अड या आयताच्या बाजू आहेत.

आयताच्या समोरासमोरील बाजू समान लांबीच्या असतात. आयताचे सर्व कोन काटकोन असतात. आयताला ‘काटकोन चौकोन’ असेही म्हणतात.


### चौरस

चौरसाला चार शिरोबिंदू असतात व चार बाजू असतात. शेजारील आकृतीत प, म, र आणि स हे चौरसाचे शिरोबिंदू आहेत.

चौरसाच्या सर्व बाजू समान लांबीच्या असतात आणि सर्व कोन काटकोन असतात.







### त्रिकोण




त्रिकोणाला तीन शिरोबिंदू व तीन बाजू असतात. य, र, ल हे त्रिकोणाचे शिरोबिंदू आहेत. बाजू यर, बाजू रल, बाजू यल या त्रिकोणाच्या तीन बाजू आहेत. त्रिकोणाला तीन कोन असतात.

◆ खालील आकृत्या पाहून सारणी पूर्ण करा.


| आकृती |  |  |  |
|---|---|---|---|
| बाजूंची नावे | बाजू अब | बाजू कख | बाजू टठ |
| | -------- | -------- | -------- |
| | -------- | -------- | -------- |
| | | -------- | -------- |
| शिरोबिंदूंची नावे | अ, ..., ... | क, ..., ..., ... | ट, ..., ..., ... |

टेस्ट सोडवा

# Identify the edges and corners of the figures.

## Geometrical figures : Vertex and side **Revision**

◆ **Observe the figures and complete the table below.**

| Figure |  |  |  |
|---|---|---|---|
| Name of figure | | | |
| Number of sides | Four | .................. | .................. |
| Number of corners | Four | .................. | .................. |

### Rectangle





A rectangle has four edges, that is, four sides. The point where two sides meet is called a **vertex**.
In the figure alongside, A, B, C and D are the vertices.

Here the sides AB, BC, CD, AD are the sides of the rectangle.

The opposite sides of the rectangle are of equal length. All the angles of a rectangle are right angles. A rectangle is also called a right-angled quadrilateral.


### Square

A square has four vertices and four sides.
In the figure alongside, P, M, R and S are the vertices of the square.







All the sides of a square are of equal length and all its angles are right angles.

### Triangle




A triangle has three vertices and three sides. Y, R and L are the vertices of this triangle. YR, RL and YL are the three sides of the triangle. A triangle has three angles.

◆ **Look at the figures and complete the table below.**

| Figure |  |  |  |
|---|---|---|---|
| Names of sides | Side AB | Side PQ | Side LM |
| | -------- | -------- | -------- |
| | -------- | -------- | -------- |
| | | -------- | -------- |
| Names of vertices | A, ..., ... | P, ..., ..., ... | L, ..., ..., ... |

टेस्ट सोडवा

**Read and enact.**

# A GARDEN OF WORDS

| | | | | |
|---|---|---|---|---|
| a | easily | many | said | time |
| and | five | more | shall | to |
| at | gave | not | she | too |
| began | hand | now | smile | took |
| but | her | of | smiled | two |
| came | I | one | some | wanted |
| come | in | only | take | was |
| could | it | out | ten | what |
| cry | liked | put | the | will |
| do | looked | quickly | there | would |

**1. Listen carefully and tick off the words in your chart.**

* and * but * one * five * ten * will * liked
* took * cry * it * do * put * there * now

**2. Find all the three-letter words and copy them in your notebook.**

**3. Read the word. From any poem, say a line that has the word.**

**Example :** began : And they began to cry.

* and * her * one * some * will

वरील तक्त्यातील प्रत्येक शब्दासाठी 8 x 4 cm किंवा अन्य आकारात जाड कागदाची कार्डे प्रत्येक मुलाकडून करून घ्यावीत. ती मुलांजवळच ठेवावीत. इंग्रजीच्या तासाव्यतिरिक्त एरवीही गटात किंवा एकट्याने खेळण्याजोगे अनेक सोपे खेळ या कार्डांच्या मदतीने घेता येतील. प्रत्येक मुलाला चांगल्या प्रकारे स्वतः लिहिलेला शब्द वारंवार व वेगवेगळ्या संदर्भांत हाताळायला मिळणे महत्त्वाचे आहे. कार्डांवरील शब्द चार रेघांत लिहिण्याची आवश्यकता नाही.

• तक्त्यातील व कार्डांवरील शब्द मुलांकडून वाचून घ्यावे. **1.** शिक्षकांनी पुस्तकात दिलेल्या क्रमापेक्षा वेगळ्या क्रमाने सावकाश एकेक शब्द सांगावा. मुलांनी आपल्या पुस्तकात/कार्डांमधून तो शब्द शोधावा. **3.** मुले जे शब्द तोंडी शिकली, त्यांची लेखन–वाचनात **योग्य त्या संदर्भासह उजळणी** व्हावी असा या स्वाध्यायाचा हेतू आहे. शब्द ऐकून किंवा कार्डावरील शब्द पाहून मुलांनी कोणत्याही कवितेतील तो शब्द असणारी ओळ म्हटली तरी चालेल. (त्यासाठी शिक्षकांनी तिसरीपर्यंत झालेल्या सर्व कविता माहीत करून घेणे आवश्यक आहे.) मुलांचे गट/जोड्या करून नंतरही या स्वाध्यायाचा **नियमित वापर करावा.**

उतारा वाचा व समजून घ्या.

## २. सजीवांचे परस्परांशी नाते

टेस्ट सोडवा


### थोडी गंमत

फुलांमधल्या गोड मकरंदावर फुलपाखरे आपली भूक भागवतात, तसे बेडकाला जमेल का ? शेळी झाडाचा पाला खाते, म्हणून वाघ खाईल का ? मासे पाण्यात श्वसन करू शकतात. पण कबुतर तसे करू शकेल का ? पाणकणीस पाण्यात वाढते, म्हणून लिंबू आणि वांगे पाण्यात वाढतील का ?

### सांगा पाहू


पाणी सोडून जमिनीवर राहायला जायचे, असे माशांनी ठरवले. ते त्यांना जमेल का ?

### करून पहा




- हिंगाच्या दोन रिकाम्या डब्या घ्या. त्यांना १ आणि २ असे क्रमांक द्या. त्या पाऊण भरतील इतकी माती त्यांत टाका. बिया पेरण्यासाठी पाणी घालून माती पुरेशी ओली करा.
- मोड आलेल्या मटकीच्या दोन-दोन बिया त्या दोन्ही डब्यांमध्ये पेरा.
- क्रमांक १ च्या डबीला रोज फक्त एकदा दोन चमचे पाणी द्या. क्रमांक २ च्या डबीला रोज चार वेळा चार चमचे पाणी द्या. असे सहा दिवस करा.

**तुम्हांला काय आढळून येईल ?**




- क्रमांक १ च्या डबीतील रोपे नीट वाढली. पण क्रमांक २ च्या डबीतील रोपे कुजायला सुरुवात झाली.

**यावरून काय उलगडते ?**

- ज्या वनस्पती पाणवनस्पती नाहीत, त्या पाणथळ जागी जगू शकत नाहीत. गरजेपेक्षा जास्त पाणी मिळाले तर त्या कुजतात.

**प्रत्येक प्रकारच्या सजीवाच्या गरजा जिथे पूर्ण होतील, तिथेच ते सजीव आढळतात.**

वाचा व समजून घ्या. 

# २. संतांची कामगिरी

सराव करा. टेस्ट सोडवा

जागृती निर्माण केली. त्यांनी भागवत धर्माच्या प्रसारासाठी महाराष्ट्रभर संचार केला. त्यांनी लोकांना भक्तीची शिकवण दिली. धर्मरक्षणाचा व भक्तिमार्गाचा खंबीर निर्धार लोकांच्या मनांत निर्माण केला. संत नामदेवांनी पुढे भारतभर प्रवास करून मानवधर्माचा संदेश पोचवला. ते पंजाबात गेले. तेथील लोकांनाही त्यांनी समतेचा संदेश दिला. हिंदी भाषेत पदे लिहिली. त्यांची काही पदे आजही शीख लोकांच्या 'गुरुग्रंथसाहिब' या धर्मग्रंथात समाविष्ट आहेत. महाराष्ट्रात तर त्यांचे अभंग घराघरांतून मोठ्या भक्तीने गायले जातात.

**संत ज्ञानेश्वर :** संत ज्ञानेश्वर आपेगावचे राहणारे. निवृत्तिनाथ व सोपानदेव हे त्यांचे बंधू. मुक्ताबाई ही त्यांची बहीण. त्या वेळचे कर्मठ लोक या मुलांना संन्याशाची मुले म्हणून नावे ठेवत, त्याचे कारण असे- त्यांच्या वडिलांनी संन्यास घेतलेला होता. घर सोडले होते, पण पुढे गुरूच्या आज्ञेवरून ते परत घरी आले आणि संसार करू लागले. पुढे त्यांना ही चार मुले झाली. हे त्या वेळच्या कर्मठ लोकांना मान्य नव्हते. लोकांनी त्यांना वाळीत टाकले होते. लोक त्या मुलांचा छळ करत होते.

ज्ञानेश्वर एकदा भिक्षेची झोळी घेऊन गावात गेले; पण कोणी त्यांना भिक्षा घातली नाही. सगळीकडे त्यांना वेडेवाकडे बोल ऐकावे लागले. त्यांच्या बालमनाला खूप दु:ख झाले. ते आपल्या झोपडीत आले. झोपडीचे दार बंद करून आत दु:ख करत बसले. इतक्यात तेथे मुक्ता आली. गवताच्या ताटीवर टिचक्या मारत ती ज्ञानेश्वरांना म्हणाली, "ताटी उघडा ज्ञानेश्वरा. अहो, आपण दु:खीकष्टी होऊन कसे चालेल? जगाचे कल्याण कोण करील?" बहिणीच्या उपदेशाने ज्ञानेश्वरांना हुरूप आला. दु:ख विसरून ते कामाला लागले. ठिकठिकाणी गोरगरिबांचा, मागासलेल्या लोकांचा धर्माच्या नावाखाली छळ होत होता. तेव्हा ज्ञानेश्वरांनी लोकांना कळकळीचा उपदेश केला, "ईश्वरावर श्रद्धा ठेवा. सगळ्यांशी समतेने वागा. दु:खी माणसांना मदत करा, त्यांचे दु:ख नाहीसे करा." त्यांचा उपदेश गेली सातशे वर्षे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत एकसारखा घुमत आहे.

त्या काळात धर्माचे ज्ञान संस्कृत ग्रंथांमध्ये बंदिस्त झाले होते. सर्वसामान्य लोकांची बोलण्याची व व्यवहाराची भाषा मात्र मराठी होती. ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेतून 'ज्ञानेश्वरी' हा फार मोठा ग्रंथ लिहिला. धर्माच्या ज्ञानाचे भांडार त्यांनी लोकांना खुले करून दिले. लोकांना बंधुभावाची शिकवण दिली. ज्ञानेश्वरांनी तरुण वयात पुण्याजवळ आळंदी येथे जिवंत समाधी



संत ज्ञानेश्वर

घेतली. आजही लाखो लोक मोठ्या भक्तिभावाने दरसाल आषाढी – कार्तिकीला आळंदी – पंढरीला जातात.

**संत एकनाथ :** संत नामदेव व संत ज्ञानेश्वर यांच्या कार्याची परंपरा संत एकनाथांनी




संत एकनाथ

पुढे चालवली. ते पैठणचे राहणारे. त्यांनी भक्तिमार्गाचा प्रसार केला. त्यांनी अनेक अभंग, ओव्या व भारुडे लिहिली. कोणताही उच्चनीच भेदभाव मानू नका, असा त्यांनी लोकांना उपदेश केला. भक्तीचा मोठेपणा त्यांनी लोकांना पटवला. गोरगरिबांना, मागासलेल्या लोकांना त्यांनी जवळ केले. इतकेच नाही, तर मुक्या प्राण्यांवरदेखील त्यांनी दया केली. प्राणिमात्रांवर दया करा, असा लोकांनाही उपदेश केला. संत एकनाथ जसे बोलत तसे वागत.

एके दिवशी ते गोदावरी नदीवर स्नानाला निघाले होते. दुपारची वेळ होती. ऊन रखरखत होते. वाळवंट तापले होते. त्या तापलेल्या वाळवंटावर एक पोरके पोर रडत बसले होते. त्याच्या रडण्याचा आवाज नाथांच्या कानी आला. त्यांनी त्याचे आईबाप जवळ आहेत का यासाठी इकडेतिकडे पाहिले. धावत ते त्या मुलाजवळ गेले. त्यांनी ते पोर उचलून कडेवर घेतले. त्याचे डोळे पुसले. त्याला त्याच्या घरी पोहोचते केले.

अशा रीतीने स्वत:च्या आचरणातून एकनाथांनी समतेची व ममतेची भावना लोकांच्या मनावर बिंबवली.

**संत तुकाराम :** शिवाजी महाराजांच्या काळात तुकाराम व रामदास हे संत होऊन गेले. संत तुकाराम हे पुण्याजवळील



संत तुकाराम

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरून...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरून डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here